# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ०१/२०२२**

**विषय : विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील संशोधन केंद्रातील पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२१ मुदतवाढी बाबत...**

**संदर्भ :** विद्यापीठ परिपत्रक क्र. ३८३ संदर्भ क्र. शै. प्रवेश/४७३८ दि. २९/१२/२०२१.

कृपया वरील संदर्भीय परिपत्रकाचे अवलोकन करावे, ज्या अन्वये सन २०२१ साठी पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापी विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा—यांचा संप, इतर सार्वजनिक सुट्टया व कर्मचा—यांची अल्प उपस्थिती इत्यादी कारणामुळे वरील संदर्भीय परिपत्रकात नमूद खालील बाबी वेळेत पूर्ण करण्यास अडचणी निर्माण झाल्यामुळे सदर प्रक्रिया पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

१. संशोधन केंद्राच्या BOD लॉगिनमध्ये आपल्या संशोधन केंद्रातील सध्या कार्यरत असलेल्या मार्गदर्शकांकडील आरक्षणनिहाय जागांचा तपशील दर्शविलेला आहे. त्यानुसार सद्यस्थितीतील कार्यरत असलेले संशोधक विद्यार्थ्यांचे आरक्षण विचारात घेऊन टक्केवारीनुसार इतर प्रवर्गास आरक्षण निश्चित करून **दि. १०/०१/२०२२** पर्यंत ऑनलाईन पध्दतीने BOD लॉगिनमधून सादर करावे.

२. संशोधन केंद्रांनी वरील बाबी विचारात घेऊन अद्ययावत केलेल्या रिक्त जागांची माहिती ही विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी तसेच त्यांना आवश्यक असल्यास संशोधन केंद्र बदलण्यासाठी **दि. १३/०१/२०२२ ते दि. १७/०१/२०२२** पर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

३. संशोधन केंद्रातील कार्यरत संशोधक मार्गदर्शकांकडे मंजूर तसेच रिक्त जागांची प्रवर्गनिहाय माहिती BOD लॉगिनमध्ये दर्शविली आहे. त्यानुसार संशोधन केंद्रांनी वरील आरक्षण निकषानुसार तपासून व त्यास अंतिम स्वरूप देऊन दि. ०८ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत मुलाखती घेण्यात याव्यात. मुलाखती प्रक्रिया राबविण्या संबंधिच्या इतर सविस्तर सूचना संदर्भीय परिपत्रकानुसार राहतील.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

संदर्भ क्र. शै.प्रवेश/५६
दिनांक : ०४/०१/२०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

मा. प्राचार्य/संचालक सर्व संलग्नित महाविद्यालय/संस्था.